| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 932 /२०२३ दि. 8/09/२०२३

**—:वाहतुक नियंत्रण अधिसुचनाः—**

**ज्याअर्थी**, कापुरबावडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२३ रोजी **'साई जलाराम प्रतिष्ठान'** तर्फे **'गोपाळकाला'** निमित्त दहिहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) साकेत कडून बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत कॉम्प्लेक्स जवळील महालक्ष्मी मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने साकेत कॉम्प्लेक्स जवळील महालक्ष्मी मंदिर येथून डावे वळण घेवून साकेत पंक्चर येथून नाशिक – मुंबई महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कशेळी कडून बाळकुम मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कशेळी येथून सरळ पुढे जावून कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) माजिवडा गावातून लोढा संकुलातून बाहेर पडून बाळकुम कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा संकुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने लोढा संकुल येथून उजवे वळण घेवून ग्लोबल हॉस्पिटल कडून साकेत कॉम्प्लेक्स, महालक्ष्मी मंदिर येथून उजवे वळण घेवून साकेत पंक्चर येथून नाशिक–मुंबई महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) नाशिक–मुंबई महामार्गावरून साकेत पंक्चर येथून डावे बाजूस वळण घेवून साकेत कॉम्प्लेक्स कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत पंक्चर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नाशिक–मुंबई महामार्गाने सरळ पुढे जावून गोल्डन नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मुंबई–नाशिक महामार्गावरून साकेत कट येथून डावे बाजूस वळण घेवून बाळकुम कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत ब्रिजखाली 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने मुंबई–नाशिक महामार्गाने डावे वळण घेवून साकेत ब्रिजखालून साकेत कॉम्प्लेक्स, महालक्ष्मी मंदिर येथून उजवे वळण घेवून माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ०७/०९/२०२३ रोजी सकाळी १०:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो लागू राहील.

CamScanner

सदरची अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायर ब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५/ वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे /वागळे व पो.निरी. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner